# समिती दर्पण

एप्रिल २०२४

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www. samiti.org


## समितीविषयी...

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी सहाय्यक समितीच्या कामाकडे पहावे लागेल. गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्च शिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉक्टर अच्युतराव आपटे, स्वातंत्र्यसेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरुवात झाली. आज समितीची पुण्यात पाच वसतिगृहे आहेत. त्यात ७५० विद्यार्थी-विद्यार्थिनींची निवास-भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी उपक्रम राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा त्रिसूत्री वर समितीचे काम चालते.

# समितीची जागतिक भरारी



**डॉ. मकरंद फडके,** विश्वस्त

परदेशातील अनेक देणगीदार विद्यार्थी साहाय्यक समितीशी गेल्या अनेक दशकांपासून जोडले गेलेले असले, तरी त्यांच्याकडून मिळणाऱ्या निधीचे प्रमाण एकूण देणग्यांच्या तुलनेत अत्यल्प म्हणजे टक्केवारीत जेमतेम एक आकडी आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी समितीने गेल्या ६५ हून अधिक वर्षांपासून समर्पित वृत्तीने केलेले काम आणि त्यातील सातत्य लक्षात घेता, आम्हाला असे वाटले की अनिवासी भारतीयांना जर समितीच्या कामाची ओळख करून दिली, तर ते या कामाशी जोडले जातील आणि त्यांना आर्थिक मदतीसाठी आवाहन करता येईल. म्हणून थिंक टँकच्या नियोजनाचा एक भाग म्हणून आम्ही जागतिक स्तरावर समितीचे कार्य जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचावे, यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे ठरवले आणि मार्च २०२४ पर्यंत परदेशी देणगीदारांकडून किमान एक लाख अमेरिकी डॉलर एवढा निधी देणगी स्वरुपात मिळविण्याचे ध्येय ठेवले. हे ध्येय गाठण्यासाठी गेल्या १५ महिन्यांत केलेले प्रयत्न आणि भविष्यातील योजनांचा आढावा या लेखात घेणार आहे.

### अनिवासी भारतीयांची समितीला भेट

समितीच्या प्रवेशद्वारातून एखादा अभ्यागत किंवा पाहुणा आत आला, त्याने येथील विद्यार्थ्यांशी, कार्यकर्त्यांशी संवाद साधला की तो समितीचा हितचिंतक, पाठिराखा होतोच, हे त्रिकालाबाधित सत्य आहे. त्यामुळे अनिवासी भारतीयांना वसतिगृह भेटीसाठी आमंत्रित करायचे



समिती भेटीदरम्यान राजीव भालेराव



समितीत शेणॉय परिवाराचे स्वागत करताना विश्वस्त तुकाराम गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी.

आणि त्यांना समितीच्या प्रत्यक्ष कामकाजाची माहिती द्यायची, अशी आमची सुरुवातीची रणनीती होती. ती मोठ्या प्रमाणात यशस्वी झाली. अनेक अनिवासी भारतीयांनी समितीला भेट दिली. या पाहुण्यांच्या भेटीदरम्यान झालेल्या बैठकांना समितीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहिले, ही विशेष नमूद करण्याजोगी बाब. अगदी आयत्या वेळी सांगूनही या बैठकांना कार्यकर्ते आवर्जून उपस्थित राहतात, याचे अनेक पाहुण्यांनीही कौतुक केले. कार्यकर्त्यांच्या समर्पित वृत्तीचा विशेष उल्लेखही केला.

### परदेशी संस्थांबरोबर धोरणात्मक युती

भारतातील धर्मादाय संस्थांना आर्थिक मदत पाठवण्यामध्ये असलेली गुंतागुंतीची प्रक्रिया आणि त्या तुलनेत स्थानिक संस्थांना देणगी देण्यात असलेली सुलभता, यामुळे अनेक देणगीदार त्यांच्या देशातील संस्थेला देणगी देण्यास प्राधान्य देतात. अमेरिकेमधील अनेक कंपन्या त्यांच्या कर्मचाऱ्यांनी स्थानिक स्वयंसेवी संस्थांना दिलेली देणगीच ग्राह्य धरतात. म्हणून आम्ही अमेरिकेतील अशा अनेक स्वयंसेवी संस्थांबरोबर करार केले, ज्या भारतातील संस्थांच्या वतीने देणगी गोळा करतात. अनिवासी भारतीय देणगीदार यापैकी कोणत्याही संस्थेला त्यांच्या देणग्या पाठवू शकतात. त्या संस्थांमार्फत ती देणगी विद्यार्थी साहाय्यक समितीला मिळू शकते. ज्या संस्थांमार्फत आम्ही ही व्यवस्था केली आहे, त्यामध्ये न्यूयॉर्कमधील महाराष्ट्र फाउंडेशन; आयडीआरएफ (वॉशिंग्टन), इंडियन्स फॉर कलेक्टिव्ह ॲक्शन, बे एरिया आणि बेनिव्हिटी यांचा समावेश आहे. या प्रयत्नांना खूप चांगले यश मिळाले. समितीला मिळालेल्या देणग्यांपैकी ९५ टक्क्यांपेक्षा जास्त देणग्या या स्वयंसेवी संस्थांमार्फत आल्या आहेत.

### समिती मित्र संकल्पना

अनिवासी भारतीयांमध्ये संपर्क वाढविण्यासाठी आम्ही समिती मित्र ही संकल्पना मांडली. या समिती मित्रांनी त्यांच्या देशात, त्यांच्या समाजात समितीचे सदिच्छादूत (अम्बॅसेडर) म्हणून काम करणे अपेक्षित आहे. आज अमेरिका, कॅनडा, दुबई, श्रीलंका आणि ऑस्ट्रेलिया या देशांमध्ये मिळून पंधरा समिती मित्र आहेत, जे समितीच्या उद्दिष्टपूर्तीसाठी आम्हाला तत्परतेने मदत करत आहेत.



आशिष अचलेरकर यांच्यासह विश्वस्त तुकाराम गायकवाड, डॉ. मकरंद फडके



शेंदुरे परिवार

### परिषद- प्रदर्शनांमध्ये सहभाग

जुलै २०२३ मध्ये सॅन होजे येथे झालेल्या गर्जे मराठीच्या परिषदेत समितीने सहभाग घेतला. समितीचा परदेशातील अशा प्रकारचा हा पहिलाच प्रयत्न होता आणि त्याला फार मोठे यश मिळाले. या व्यासपीठावरून समितीचे काम प्रथमच देशाबाहेर पोचले. त्याचप्रमाणे दुबई येथे महाराष्ट्र बिझनेस फोरमने आयोजित केलेल्या कार्यक्रमामुळे समितीला मध्य पूर्व आणि आफ्रिकेतील मराठी माणसांपर्यंत पोचण्यास मदत झाली. समितीचे अध्यक्ष श्री. प्रतापराव पवार यांनी गर्जे मराठी आणि महाराष्ट्र बिझनेस फोरम या दोन्ही कार्यक्रमांना उपस्थित राहून समितीचे नेतृत्व केले. त्यांनी त्यांचे तेथील असंख्य संपर्क दिले आहेत.

सॅन होजे येथील गर्जे मराठी परिषदेच्या आधी आणि नंतरही आम्ही ॲन आर्बर, क्लीव्हलँड, पिट्सबर्ग, शिकागो, ह्यूस्टन, डलास, ऑस्टिन अशा अनेक शहरांना भेटी दिल्या. समितीच्या कार्याचा प्रचार करण्यासाठी तेथे बैठका घेतल्या. गेल्या महिन्यात ॲन आर्बर मराठी मंडळाने त्यांच्या गुढीपाडव्याच्या कार्यक्रमाला आम्हाला निमंत्रित केले होते. तेथे स्टॉल लावण्याची, तसेच व्यासपीठावर उपस्थित राहण्याची संधी दिली गेली. कार्यक्रमाला मंडळाचे चारशेहून अधिक सदस्य उपस्थित होते. समितीच्या कार्याचे आणि कर्तृत्वाचे सगळ्यांकडून कौतुक झाले, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमधील अनिवासी भारतीयांना समितीच्या कार्याची माहिती देण्यासाठी २८ एप्रिलला ऑनलाइन चर्चासत्र आयोजित केले होते. समितीच्या कार्यकर्त्या सुप्रियाताई केळवकर आणि समिती मित्र नितीन नाईक यांच्या सहकार्यामुळे हे चर्चासत्र आयोजित करणे शक्य झाले.

### कमवा- शिका योजनेचे जागतिकीकरण

समितीची कमवा- शिका योजना ही समितीमधील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात महत्त्वाची भूमिका बजावते. ही योजना विद्यार्थ्यांना केवळ त्यांचा शैक्षणिक खर्च आणि समितीचे शुल्क भरण्यासाठी पैसे कमविण्यास मदत करते, असे नाही, तर ती त्यांना मोलाचा अनुभव देखील मिळवून देते. कमवा- शिका योजनेसाठी साधारणपणे पुण्यातील नोकऱ्या किंवा काम देणाऱ्या संस्था किंवा व्यक्ती यांच्यावरच लक्ष केंद्रित असते. तथापि, डिजिटल तंत्रज्ञान, संपर्काची आधुनिक साधने यामुळे ही योजना पुण्यापुरती मर्यादित ठेवण्याची आता गरज राहिलेली नाही. या योजनेचा आवाका वाढवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना नवीन युगातील उद्योगांची ओळख करून देण्यासाठी, समितीने या योजनेचे जागतिकीकरण करण्याचा निर्णय घेतला. यामुळे केवळ जॉबची संख्या वाढणार नाही, तर विद्यार्थ्यांना जागतिक वातावरणात काम करण्याची संधी मिळणार आहे. याची सुरुवात जुलै २०२३ मध्ये गर्जे मराठी परिषदेच्या वेळी झाली. या परिषदेसाठी डिजिटल मीडिया सपोर्टचे काम या योजनेंतर्गत करण्यात आले. त्याच्या यशानंतर बीएमएम २०२४, ॲन आर्बर मराठी मंडळ यांचीही डीजीटल सपोर्टची कामे या योजनेतून करण्यात आली. अशी आणखी कामेही

पान २ वर ▶

# समान भूमिकेमुळे 'रोश'ची देणगी महत्त्वपूर्ण

## प्रतापराव पवार प्रतिपादन, समितीत होतकरू विद्यार्थ्यांची जडणघडण




'समाजात चांगल्या अर्थाने बदल घडावा, ही रोश कंपनीची भूमिका आहे आणि त्याच विचारातून विद्यार्थी साहाय्यक समितीही काम करते. गरजू, होतकरू विद्यार्थ्यांच्या जडणघडणीतून आम्ही समाजात ऑक्सिजन पेरतो. त्यामुळे रोश इन्फॉर्मेशन सोल्यूशन्स इंडिया प्रा. लि. या कंपनीने सामाजिक उत्तरदायित्व योजनेंतर्गत (सीएसआर) समितीला दिलेली देणगी महत्त्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांनी केले.

सामाजिक उत्तरदायित्व योजनेअंतर्गत (सीएसआर) रोश कंपनीने दिलेल्या देणगीतून अद्ययावत संगणक कक्ष आणि अभ्यासिका उभारली जाणार आहे. देणगीचा धनादेश कार्यकर्ता मंडळाच्या बैठकीत सुपूर्द करण्यात आला. त्यावेळी प्रतापराव पवार बोलत होते.

कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक राजा जमलमडका यांनी देणगी देण्यामागची भावना व्यक्त केली. केवळ पैसे देणे एवढाच आमचा उद्देश नाही, तर त्यातून समाजात परिवर्तन झाले पाहिजे, असे म्हणाले. यावेळी रोश कंपनीचे ज्ञानेश्वर घुगे आणि त्यांचे सहकारी उपस्थित होते.

> समितीचे काम खूप चांगले आहे. विद्यार्थ्यांना घडवताना त्यांना उद्योजकतेचे धडे देण्याचे प्रयत्न बदलत्या काळाशी सुसंगत आहेत. या कामाला आर्थिक मदत तर करूच, पण थेट कामात मदत करायलाही आवडेल.
>
> - **श्री. राजा जमलमडका,** व्यवस्थापकीय संचालक, रोश कंपनी

> सामाजिक विचारांतून विद्यार्थ्यांच्या जडणघडणीसाठी रोश कंपनीने लावलेला हातभार आनंददायी आहे. देणगीच्या माध्यमातून रोश कंपनी समितीसोबत जोडली गेली असून हे नाते दीर्घ काळाचे राहील.
>
> - **प्रतापराव पवार,** अध्यक्ष, विद्यार्थी साहाय्यक समिती.

# ॲन आर्बर मराठी मंडळाच्या परिषदेत समितीला संधी

अमेरिकेतील ॲन आर्बर शहरात २८ एप्रिल रोजी ॲन आर्बर मराठी मंडळाची परिषद झाली. या परिषदेत विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाची ध्वनिचित्रफित दाखविण्यात आली. परिषदेला मंडळाचे चारशेहून अधिक सदस्य उपस्थित होते. समितीचे विश्वस्त डॉ. मकरंद फडके यांनी उपस्थितांना समितीची कमवा आणि शिका योजना (सोशल मीडिया सपोर्ट प्रोजेक्ट) आणि सामाजिक जाणीव संकल्पाविषयी माहिती दिली.

परिषद ज्या प्रेक्षागृहात झाली तेथील लॉबीत समितीचा स्टॉल होता. या स्टॉलला अनेकांनी भेट देऊन समितीची माहिती घेतली. समितीच्या कामाला पाठिंबा देत सहभागाची इच्छा व्यक्त केली. समितीला ही संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल राजीव कुलकर्णी आणि ॲन आर्बर मराठी मंडळाचे अध्यक्ष सिद्धार्थ शेंडे यांचे आभार.



# समितीची जागतिक भरारी



*दुबईत झालेल्या परिषदेत समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्यासह समितीमित्र.*

▶पान १ वरून

मिळण्याच्या मार्गावर आहेत.

समितीचे माजी विद्यार्थी ओंकार वाघमारे या उपक्रमाचे नेतृत्व करत आहेत. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी त्यांनी घेतलेला पुढाकार वाखाणण्याजोगा आहे. समितीच्या वतीने सामाजिक जाणीव प्रकल्प राबविण्यात येतो. या प्रकल्पांतर्गत समितीचे विद्यार्थी पुणे महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना अभ्यासात मदत करतात, मार्गदर्शन करतात. समितीच्या विद्यार्थ्यांना कमवा- शिका योजनेंतर्गत या कामाचा मोबदला दिला जातो. ही योजना ॲन आर्बर मराठी मंडळासमोर सादर करण्यात आली, तेव्हा या योजनेसाठी निधी देण्याची तयारी या मंडळाने दाखविली. ही कल्पना आम्ही ऑस्ट्रेलियातील बैठकीतही मांडली. या त्रिवेणी प्रकल्पामुळे योजनेसाठी तिहेरी लाभ होईल. त्यात वाढ करण्यासही भरपूर वाव आहे. ही कल्पना सुचवल्याबद्दल ॲन आर्बर मंडळाचे श्री. राजीव कुलकर्णी यांचे आभार.

### मोहिमेचे यश

सन २०२२ च्या डिसेंबरमध्ये आम्ही ही मोहीम सुरू केली. तेव्हापासून परदेशातील देणगीदारांकडून आम्ही ५ लाख ४६ हजार अमेरिकी डॉलर (USD) म्हणजेच ४ कोटी ४८ लाख रुपयांच्या देणग्या मिळविल्या आहेत, तर १ लाख डॉलरहून (USD) अधिक देणग्यांचे आश्वासन मिळाले आहे. मिळालेल्या देणग्यांमध्ये श्री. आणि सौ. शेंदुरे, श्री. आणि सौ. गोगटे, तसेच शेणॉय दांपत्य यांचे योगदान मोठे आहे. यांच्याकडून मिळालेल्या मोठ्या देणग्यांव्यतिरिक्त, पन्नासहून जास्त देणगीदारांनी सुमारे ९७ हजार डॉलरचे (USD) योगदान दिले आहे. यावरून हे दिसून येते की, आम्ही हळूहळू परंतु शाश्वत असा दात्यांचा आधार तयार करत आहोत. आर्थिक मदतीबरोबरच, अनेक जण समितीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शनही करत आहेत, त्यांच्यातील कौशल्ये विकसित करण्याकरता मदत करत आहेत. ऑस्टिन येथील श्री. तेंडोलकर यांनी विद्यार्थ्यांचे वैयक्तिक माहिती (Resume) लेखनाचे कौशल्य सुधारण्यासाठी ऑनलाइन वर्ग आयोजित केले आहेत. श्रीमती मीनल रेणावीकर विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञान विषयात मदत करत आहेत. गर्जे मराठीच्या स्वयंसेवकांनी या विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेची ठिणगी पेटवण्यास मदत केली आहे. समिती संस्कृतीचे एक वैशिष्ट्य म्हणजे एकदा का एखाद्या दिशेने वाटचाल करण्याचा निर्णय घेतला की, प्रत्येक जण त्यात सहभागी होतो. हा उपक्रमही त्याला अपवाद नाही. आम्हाला सर्वांचा प्रचंड पाठिंबा मिळत आहे.

### भविष्यकालीन योजना

आता पुढे काय? सुरुवातीच्या यशाने प्रोत्साहित होऊन आम्ही या उपक्रमाला आणखी गती देण्याचा विचार करत आहोत. जून २०२४ मध्ये सॅन होजे, कॅलिफोर्निया येथे होणाऱ्या बीएमएम २०२४ मध्ये आमचा स्टॉल असेल. या कार्यक्रमाला अमेरिका, कॅनडामधून पाच हजारांहून अधिक मूळचे महाराष्ट्रीयन उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. बीएमएम २०२४ पूर्वी आणि नंतरही आम्ही अनेक शहरांना भेटी देऊ आणि महाराष्ट्र मंडळाच्या बैठकांना उपस्थित राहू. सर्वांना विनंती आहे की, या बैठकीबद्दलचा संदेश त्यांनी आपले मित्र आणि नातेवाईकांना पाठवावा.

वर नमूद केलेल्या नजीकच्या काळातील प्रयत्नांव्यतिरिक्त, केवळ अमेरिकेमध्येच नाही तर जगाच्या इतर भागांमध्येही अनिवासी भारतीयांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. समितीचे कार्य अधिकाधिक अनिवासी भारतीयांपर्यंत पोचविण्याचा आमचा मानस आहे. समिती मित्रांची एक फळी तयार करायची आहे, ज्याद्वारे समितीच्या विद्यार्थ्यांसाठी कमवा आणि शिका योजनेत अधिक संधी निर्माण होतील. आम्हाला सतत पाठिंब्याची गरज आहे, त्यासाठी कार्यकर्ते, माजी विद्यार्थी सक्षम आहेत. समितीचा इतिहास आणि लौकिक पाहता आम्हाला खात्री आहे की आम्ही आमचे नक्की ध्येय निश्चितच साध्य करू.

## प्रतिसाद

### ...आणि अप्रगत विद्यार्थ्यांचा सुधारला अभ्यास



आमच्या हुतात्मा बालवीर शिरिषकुमार माध्यमिक विद्यालयातील (शिवाजीनगर) इयत्ता नववीच्या वर्गांमधील काही विद्यार्थी हे लेखन व वाचनात अप्रगत होते. समितीच्या सामाजिक जाणीव प्रकल्पांतर्गत विद्यार्थिनींनी या विद्यार्थ्यांचे लेखन व वाचन सुधारण्यासाठी काही तास घेऊन विशेष प्रयत्न केले. त्यांना मार्गदर्शन केले. त्याचे यश आवर्जून सांगावसे वाटते. या तासांमुळे इयत्ता नववी 'ड'मधील दोन विद्यार्थी आकाश सुभाष नरवाडे आणि अमीर हबीब खान यांनी प्रगती केली. त्यांच्या अभ्यासात खूप सुधारणा दिसून आली. या विद्यार्थ्यांनी सत्र दोनचे पेपर व्यवस्थित सोडवले आहेत. समितीच्या विद्यार्थिनींनी केलेल्या प्रयत्नांमुळेच या विद्यार्थ्यांना अभ्यासात गोडी निर्माण झाली. याबद्दल समितीचे आणि विद्यार्थिनींचे खूप खूप आभार.

- **संध्या जाधव,** मुख्याध्यापिका, हुतात्मा बालवीर शिरिषकुमार विद्यालय

# विद्यार्थी साहाय्यक समिती ही एक जीवनशैली

## डॉ. गिरीश कुलकर्णी यांची भावना, नगरला माजी विद्यार्थी मेळावा



**अहमदनगर :** विद्यार्थी साहाय्यक समितीच्या वसतिगृहात ग्रामीण भागातून आलेल्या गरीब, गरजू विद्यार्थ्यांना उत्तम संस्कारांतून जीवनाची नवी दिशा आणि ऊर्जा मिळते. समिती ही एक जीवनशैली आहे, अशी भावना स्नेहालय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी व्यक्त केली. विद्यार्थी सहायक समितीने नगर येथे नव्याने उभारलेल्या कै. मधुभाऊ चौधरी मुलींच्या वसतिगृहात आयोजित समितीच्या माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्यात ते बोलत होते. सावेडी भागातील बालिकाश्रम रस्त्यावरील महालक्ष्मी उद्यानामागे हे मुलींसाठी सुसज्ज वसतिगृह बांधण्यात आले आहे. समितीच्या कार्याचा प्रचार आणि प्रसार व्हावा, या हेतूने समितीच्या नगर जिल्ह्यातील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा माजी विद्यार्थी मंडळाच्या वतीने आयोजित केला होता.

विश्वस्त तुकाराम गायकवाड यांनी समितीच्या उभारणीत कार्यकर्त्यांचे, देणगीदारांचे योगदान किती महत्त्वाचे आहे, हे विशद केले. गेल्या ६० वर्षांपासून समिती अव्याहत विद्यार्थ्यांना उत्तम संस्कार देत आहे. नवीन बदल घडवत असताना समितीची मूळ नीतीमूल्ये, धोरणे जोपासली जात आहेत. संस्थापक डॉ. अच्युतराव आपटे यांनी विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी आखलेले ध्येय आणि उद्दिष्टे कार्यकर्ते मुलांपर्यंत पोचवित आहेत. नगरचे कै. रमाकांत तांबोळी यांनी समितीसाठी झोकून देऊन काम केले. अनेक कार्यकर्ते त्यांच्या सहवासात घडले. नगरमध्ये समितीची वास्तू व्हावी, असे त्यांचे स्वप्न होते. ते आज खऱ्या अर्थाने पूर्ण झाले, असे श्री. गायकवाड यांनी सांगितले.

माजी विद्यार्थ्यांकडून समितीच्या कार्याचा परदेशात होत असलेला प्रसार, तेथून मिळणारा मदतीचा हात याविषयी माहिती कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांनी दिली. नगरमध्ये येत्या जूनपासून साठ मुलींची सोय असणारे कै. मधुभाऊ चौधरी वसतिगृह सुरू होत आहे. प्राज इंडस्ट्रिजचे श्री. प्रमोद चौधरी आणि सौ. परिमल चौधरी यांनी दिलेल्या भरीव देणगीतून हे वसतिगृह उभे राहिले आहे, असेही त्यांनी सांगितले. माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष गणेश काळे यांनी मंडळाच्या कामाची माहिती दिली. रत्नाकर मते, सुनीता झिंजाड यांनीही विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नगरचे कार्यकर्ते नंदकुमार देशपांडे यांनी केले. कार्यक्रमाची संकल्पना कार्यकर्ते शिवाजीराव बोलभट यांनी मांडली. आभार कार्यकर्ते रवींद्र देशपांडे यांनी मानले.

# 'समितीतील वास्तव्य हा सुखद प्रवास'



'समितीशी जुळलेले नाते म्हणजे आयुष्याला झालेला परिसस्पर्श वाटतो. परिचय सभेपासून सदिच्छा समारंभापर्यंतचा प्रवास सुखद व आनंददायी होता. समितीतील वास्तव्यात व्यक्तिमत्त्वात मोठा बदल झाला,' अशा भावना शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांनी समितीला निरोप देताना व्यक्त केल्या.

समितीतील शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांसाठी ६ एप्रिलला सदिच्छा समारंभ झाला. कार्यक्रमात सुरुवातीला सर्व विद्यार्थी- विद्यार्थिनींचे औक्षण करून, त्यांना गुलाबपुष्प देण्यात आले. प्रास्ताविक अनुष्का राऊत हिने केले. अनिकेत राक, अभिषेक आटोळे, आर्या देशमुख, साक्षी बोरगे, वेदांत दिवटे, वैष्णवी, शिवानी आव्हाड, पल्लवी जाधव, स्नेहा साळुंखे, जितेंद्र टिळे, सुमित लोळगे, सौरभ कोकरे, नदीम इनामदार, सुचेता देशमुख, साईनाथ कोळपे, साक्षी वाळके, संदेश पाटील, रोहिदास तोत्रे, वैभव जाधव, अजय पठाडे, नागेश पंचलिंग, राज शेख या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. समितीमध्ये झालेल्या संस्कारांमुळे जीवनाकडे बघण्याचा नवीन दृष्टिकोन मिळाला, आत्मविश्वास वाढला, चांगला मित्रपरिवार मिळाला, असे त्यांनी आवर्जून नमूद केले. माजी विद्यार्थी म्हणून समितीसाठी काम करण्याची इच्छा काहींनी व्यक्त केली. पर्यवेक्षकांविषयी सर्वांनी कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, तुकाराम गायकवाड, विश्वस्त संजय अमृते, प्रभाकर पाटील, मनीषा गोसावी, मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी, पर्यवेक्षिका सविता भुकते यांनी मार्गदर्शन केले. कार्यकर्ते दिनकर वैद्य, रवींद्र नामजोशी, वासंती नाटेकर, निसार चौघुले, सुरेश उमाप, गणेश काळे, मनोज गायकवाड तसेच सर्व वसतिगृहांचे पर्यवेक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जीवन बोधले याने केले. ओंकार शिंदे याने आभार मानले.

## समिती वृत्त

### डॉ. मोहन आगाशे यांच्याकडून मिळाला अमूल्य पुस्तकांचा ठेवा

अभिनेते डॉ. मोहन आगाशे यांनी त्यांच्या संग्रहातील सुमारे दीड हजार पुस्तके समितीच्या ग्रंथालयासाठी भेट दिली. दिग्गजांची आत्मचरित्रे, व्यक्तिचित्रे, कथा, कांदबऱ्या, जुनी नियतकालिके याबरोबरच नाट्य, संगीत, चित्रपट, चित्रकला अशा विविध विषयांवरील पुस्तकांचा खजिना या निमित्ताने समितीच्या विद्यार्थ्यांना मिळाला आहे. मानसोपचार, ताणतणाव व्यवस्थापन या विषयावरील पुस्तकांचाही त्यात समावेश आहे.

### मुलींच्या नवीन वसतिगृहातील प्रवेशासाठी वेबसाइटवर लिंक

पुण्यातील समितीच्या लजपतराय संकुलाच्या आवारात नव्याने उभारण्यात आलेल्या मुलींच्या वसतिगृहात येत्या शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थिनींना प्रवेश देण्यात येणार आहे. त्यासाठी समितीच्या वेबसाइटवर लिंक देण्यात आली आहे. द्वितीय, तृतीय वर्षाच्या, तसेच त्यापुढील शिक्षण घेणाऱ्या ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना या लिंकद्वारे प्रवेशासाठी अर्ज करता येणार आहे.

### मराठा आंत्रप्रेन्युअर्सच्या परिषदेत समितीचा स्टॉल




मराठा आंत्रप्रेन्युअर्स असोसिएशनच्या वतीने २७ एप्रिलला पुण्यात सिद्धी गार्डन येथे आयोजित केलेल्या परिषदेदरम्यान स्टॉल उभारण्याची संधी विद्यार्थी साहाय्यक समितीला मिळाली. समितीच्या प्रतिनिधींनी यावेळी परिषदेला आलेल्या लोकांना समितीच्या कामाविषयी माहिती दिली.

परिषदेत इतरही १८ स्टॉल होते. प्रतिनिधींनी प्रत्येक स्टॉलला भेट देऊन समितीविषयी माहिती सांगितली. बऱ्याच लोकांनी समितीच्या कामाविषयी उत्सुकता दाखविली व लवकरच संस्थेला भेट देण्याचे आश्वासन दिले. काही जणांनी मुलांना जॉब देण्याची तसेच मुलांची कौशल्ये वाढवण्यासाठी मदत करू तसेच सीएसआर मिळवण्यासाठीही सहकार्य करू, असे सांगितले. समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी, विश्वस्त तुकाराम गायकवाड, रत्नाकर मते यांनी स्टॉलला भेट देऊन मार्गदर्शन केले.